


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २२५, गुरुवार २३ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# ईव्हीएम गोदामाच्या शटरपर्यंत पोहचला अनोळखी इसम!

■ लंके समर्थकांनी लक्ष वेधल्यानंतर जिल्हयात खळबळ ■ तो अधिकृत तांत्रिक कर्मचारी असल्याचा प्रशासनाकडून खुलासा
■ सीसीटीव्ही यंत्रणेत छेडछाडीचा नीलेश लंके यांच्याकडून संशय ■ निवडणूक आयोगाशी पत्रव्यवहार करणार असल्याची माहिती

नगर : विशेष प्रतिनिधी

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार व भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे व महाविकास आघाडीचे उमेदवार मा. आ. नीलेश लंके यांच्यात हायहोल्टेज निवडणूक झाल्यानंतर या निवडणूकीची राज्यात चर्चा सुरू असताना मंगळवारी रात्री एक ट्विस्ट निर्माण झाला. ईव्हीए गोदामाच्या शटरपर्यंत पोहचलेल्या अनोळखी इसमावर लंके समर्थकांनी आक्षेप घेत तो सीसीटीव्ही डीव्हाईसमध्ये छेडछाड करीत असल्याचा आरोप केला. नीलेश लंके यानीही त्यास दुजोरा दिला. दरम्यान तो अधिकृत तांत्रिक कर्मचारी असल्याचा खुलास जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी केला आहे. दरम्यान हा प्रकार शंकास्पद असून त्यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे नीलेश लंके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



■ ईव्हीएम ठेवलेल्या सीसीटीव्ही डिव्हाईसजवळ एक व्यक्ती गेल्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या समर्थकांनी त्यावर आक्षेप घेतला. ■ ईव्हीएम डिव्हाईसजवळ जाणाऱ्या त्या व्यक्तीस लंके समर्थकांनी जाब विचारला.

### जिल्हाधिकाऱ्यांकडेही अचूक माहिती नव्हती

मंगळवारी रात्री ८ वाजून २२ मिनिटांच्या सुमारास एक अज्ञात व्यक्तीने प्रवेशद्वारातून प्रवेश केला. ज्या ठिकाणी स्थानिक पोलीसांचा, केंद्रीय पोलीस यंत्रणांचा पहारा आहे, त्या ठिकाणी येऊन मुख्य गेटजवळ ज्या ठिकाणी डिव्हाईस ठेवण्यात आले आहेत त्या ठिकाणी मोबाईल काढून छेडछाड करण्यात येत असल्याचे कार्यकर्त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी माझ्याशी संपर्क केला. त्याबाबत मी जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क करून माहीती दिली असता त्यांच्याकडेही अचूक अशी काही माहीती नव्हती असे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### कोणीही असो परवानगी हवीच

सीसीटीव्हीचा तंत्रज्ञ असो किंवा कोणीही असो. आत प्रवेश करताना प्रत्येकाने परवानगी घेतली पाहिजे. तिथे आमचे सहकारीही उपस्थित आहेत, त्यांनाही त्याबाबत कल्पना द्यायला हवी. तसा कोणताही संपर्क करण्यात आलेला नाही. आमच्या सहकाऱ्यांनी विचारणा केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यामुळे आमच्या दृष्टीने ही शंकास्पद बाब असल्याचे लंके यांनी सांगितले.

### लोकशाही चोरी करण्याचा प्रयत्न केला जातोय !
### संरक्षण व्यवस्था थोडे उठा, माणूस गोदामापर्यंत आलाय.

काल रात्री आमच्या नगर दक्षिण अहिल्यानगर मतदारसंघाच्या ईव्हीएम ठेवलेल्या ठिकाणी त्रिस्तरीय सुरक्षा भेदून एका इसमाने प्रवेश करून चक्क शटरपर्यंत जात सीसीटीव्हीमध्ये बिघाड करण्याचा प्रयत्न केला. माझ्या सहकाऱ्यांनी तो लगेच हाणून पाडला. माझे सहकारी हा इसम पकडू शकतात, मग कोणतीही पूर्व सुचना न देताना गेलेल्या त्या व्यक्तीला त्रिस्तरीय सुरक्षा का रोखू शकली नाही ? कुंपनच शेत खातंय.. लोकशाही चोरी करण्याचा प्रयत्न केला जातोय. पण प्रशासन मात्र उघडया डोळ्यांनी पाहतंय.

नीलेश लंके यांचे ट्विट

### तो अधिकृत तांत्रिक कर्मचारी

ज्या ठिकाणी ईव्हिएम मशिन ठेवण्यात आलेले आहेत तिथे सुरक्षा यंत्रणा लावण्यात आलेली आहे. आतील बाजूस सीआरपीएफ, मधल्या बाजूस एसआरपीएफ आणि बाहेरच्या बाजूला स्थानिक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सील करण्यात आलेले गोदाम दाखविण्यासाठी सीसीटीव्ही लावण्यात आलेले आहेत. सीसीटीव्हीची एक वायर ढिली झाल्याने तांत्रीक देखभाल दुरूस्तीसाठी असलेला कर्मचारी रजिष्टरला रितसर नोंद करून सोबत पोलीस बंदोबस्त घेऊन तिथे गेला होता. दुरूस्ती करून कर्मचारी बाहेर परतला. बाहेरची कोणतीही व्यक्ती आत गेलेली नाही. सीसीटीव्हीमध्ये कोणतीही छेडछाड होण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

सिध्दाराम सालीमठ
जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी

### निवडणूक आयोगाचे लक्ष वेधणार

जी व्यक्ती डिव्हाईसजवळ गेली होती त्यास आमच्या सहकाऱ्यांनी विचारले असता मला जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिल्याचे त्याने सांगितले. त्याबाबतही जिल्हाधिकाऱ्यांकडे विचारणा करण्यात आली असता त्यांनी मला काही माहीती नाही असे उत्तर दिले. ही शंकास्पद बाब असून त्यासंदर्भात आपण निवडणूक आयोगाकडे पत्रव्यवहार करणार आहोत.

नीलेश लंके
उमेदवार, महाविकास आघाडी

### आमच्या सहकाऱ्यांचा २४ तास पहारा

एईव्हीएम मशिन ठेवण्यात आलेल्या गोदामाबाहेर पहारा देण्यासाठी आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे परवानगी मागितल्यानंतर त्यांनी रितसर परवानगी दिली आहे. आमचे सहकारी गोदामास २४ तास पहारा देत आहेत असल्याचे लंके म्हणाले.

### ओळखपत्र हवे

ती व्यक्ती अधिकृत व्यक्ती असल्याचे प्रशासनाने जरी स्पष्ट केले असले तरी त्याच्याकडे प्रशासनाने दिलेले ओळखपत्र असणे आवष्यक आहे. ओळख पटविणारे कोणताही पुरावा त्या व्यक्तीकडे नव्हता असे नीलेश लंके यांनी सांगितले.

### कलेक्टर साहेबांनी सांगितले तर सांगेल !

त्या कर्मचाऱ्याकडे लंके यांच्या सहकाऱ्यांनी विचारणा केली असता कलेक्टर साहेबांनी सांगितले तरच मी तुम्हाला सांगेल असे उत्तर दिले. दि. २१ मे रोजी रात्री ८ वाजून २२ मिनिटांचे फुटेज असताना कर्मचारी मात्र ते पूर्वीचे असल्याचे सांगत उडवाउडवीची उत्तरे देत होता. एका कॅमेऱ्याची वायर ढिली झाल्याचे सांगितले जात असले तरी त्या कॅमेऱ्याचा डिव्हाईस तो कर्मचारी जिथे गेला तिथे नव्हताच हे देखिल पुढे आले आहे. फुटेजमधील चित्रणानुसार त्या कर्मचाऱ्यासोबत पोलीस कर्मचारीही उपस्थित नव्हते.

## चाऱ्यातून झालेल्या विषबाधेने ३० मेंढ्या दगावल्या

पाच लाखांचे नुकसान चाऱ्याच्या शोधात भटकंती करणाऱ्या मेंढपाळ कुटुंबावर दुःखाचा डोंगर

पारनेर : प्रतिनिधी

मेंढ्यांसाठी चाऱ्याच्या शोधात भटकंती करणाऱ्या मेंढपाळ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.पारनेर तालुक्यातील कुकडी कालव्याच्या लाभक्षेत्रात, नारायण गव्हाण शिवारात चाऱ्यातून विषबाधा झाल्यामुळे तान्हाजी टकले (कोहकडी,पारनेर) यांच्या ३० मेंढ्या मृत्यूमुखी पडल्या तर पाच मेंढ्या विषबाधेमुळे अत्यवस्थ आहेत.मंगळवारी (२१ मे) सकाळी ही दुर्दैवी घटना घडली.एका मेंढीची किंमत १५ ते २० हजार रुपयांदरम्यान असते.टकले कुटुंबाचे पाच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

दरम्यान घटनेची माहिती समजताच भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे,पशुधन विकास आयुक्त सोपान नांदे, पशुधन विकास अधिकारी नवनाथ पडवळ,सहायक पशुधन विकास अधिकारी बी.डी.महांडुळे यांनी घटनास्थळी भेट दिली.अत्यवस्थ असलेल्या मेंढ्यावर उपचार करण्यात आले.तर महसूल प्रशासनाने पंचनामा केल्यानंतर मृत मेंढ्याचे शवविच्छेदन करण्यात आले.

मेंढ्यांना नेमकी विषबाधा कश्यातून झाली हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी,जास्त प्रमाणात कांदे खाल्ल्याने विषबाधा झाली असावी असा प्राथमिक अंदाज आहे.मेंढ्याच्या शवविच्छेदनानंतर त्यांच्या पोटात आढळलेले अन्नाचे नमुने व इतर काही अवयव तपासणीसाठी उर्वरीत पान ३ वर



### जास्त कांदे खाल्ल्याने विषबाधा

मेंढ्या नेमक्या कशाने दगावल्या हे समजायला मार्ग नाही.जास्त कांदे खाल्ल्याने मेंढ्यांना विषबाधा झाली असल्याचे डॉक्टर सांगत आहेत.पण मेंढ्या नेहमीच कांदे खातात.याच्या आधी असे कधी झाले नाही. सरकारच्या मदतीतून नुकसान भरून येणार नाही.मात्र जास्तीत जास्त मदत मिळायला पाहिजे.

बापू टकले (तान्हाजी टकले यांचे पुतणे)

### मदतीसाठी प्रस्ताव पाठवणार

मेंढपाळ टकले यांना मदत मिळावी यासाठी जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडे प्रस्ताव पाठवण्यात येईल.सेस फंडातून टकले यांना मदत मिळू शकते.निकषानुसार मेंढपाळाच्या एका कुटुंबाला प्रत्येक मृत मेंढीसाठी दोन हजार रुपयांप्रमाणे, जास्तीत जास्त पाच मेंढ्यांसाठी दहा हजार रुपयांपर्यंत मदत देण्याची तरतूद आहे.

सोपान नांदे, पशुधन आयुक्त,पारनेर.

## १२ वर्षांनी त्यांना जाग आली!

■ माझ्यामुळे त्यांचे अनेक मंत्री घरी गेले ■ अण्णा हजारेंचे शरद पवारांना प्रत्युत्तर

मुंबई : प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीतील पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडले आहे. राज्यातील प्रचारसभा संपल्या आहेत. या पार्श्वभूमीवर खासदार शरद पवार यांनी एका वृत्तपत्राला मुलाखत दिली. यावेळी पवार यांनी सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. ''काही वर्षांपूर्वी अण्णा हजारे आणि बीएमसीचे माजी अधिकारी जी.आर. खैरनार यांनी माझ्यावर गंभीर आरोप केले होते. मात्र, ते दोघेही आता कुठे दिसत नाहीत, अशी टीका शरद पवार यांनी अण्णा हजारे यांच्यावर केली होती. या टीकेली आता सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.



''दहा, बारा वर्षे झालीत त्यांना आता कशी जाग आली मला माहित नाही, त्यांचे मी बारा वर्षापूर्वी काही मंत्री घरी पाठवले. बारा वर्षानंतर त्यांना आता जाग आली, एक तप गेले. शरद पवार यांचे नातलग पद्मसिंह पाटील त्यांचे मी ज्यावेळी पुरावे काढले तेव्हा राजीनामा द्यावा लागला, असं प्रत्युत्तर आण्णा हजारे यांनी शरद पवार यांना दिले. समाजाच्या हितासाठी पुरावे बाहेर काढणे दोष आहे का? म्हणून मी जिथे जिथे दिसले तिथे बोलत गेलो, असंही अण्णा हजारे म्हणाले.

''प्रत्येक पक्षात समविचारी लोक असतात तसे आव्हाड आणि ते आहेत. ते समविचारी लोक आहेत. त्यांना दुसर काही दिसतच नाही, अंधारी डोळ्यासमोर आल्यासारख एकच दिसते. मी जर हवेत बोललो असतो तर शरद पवार यांचे मंत्री घरीच गेले नसते. मी आंदोलन केले म्हणून ते घरी गेले. मी अनेक पक्षाचे मंत्री घरी घालवले, असंही अण्णा हजारे म्हणाले.

**शरद पवारांची अण्णा हजारे यांच्यावर टीका**

एका मुलाखतीमध्ये बोलताना शरद पवार म्हणाले होते, माझ्याविरोधात ट्रकभर पुरावे असल्याचा दावा तत्कालीन उपायुक्त जी.आर. खैरनार आणि अण्णा हजारे यांनी केला होता. या आरोपांची चौकशीही झाली होती. उर्वरीत पान ३ वर






# युवा

# परफेक्ट निवडताना!



**लग्नासाठी परफेक्ट स्थळ निवडणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. जर तुम्ही लग्न अगदी पारंपरिक पद्धतीने करत असाल म्हणजे अगदी वधूवर सुचक मंडळात जाऊन तुम्ही नाव नोंदवले असेल तर अशावेळी स्थळ निवडताना खूपच जबाबदारीपूर्वक काम करावे लागते. कारण बरेचदा लग्न जुळवताना फसवणुकीचे किस्से तुम्हीही ऐकले असेल. लग्न करण्यापूर्वी सांगितलेल्या बऱ्याच गोष्टी या खोट्या सांगितल्या जातात. या गोष्टी लग्न झाल्यानंतर कळतात. अशावेळी परफेक्ट आणि अचूक स्थळ निवडताना किंवा कोणताही निर्णय घेण्याआधी या गोष्टी नक्कीच लक्षात घ्यायला हव्यात...**

- स्थळांची करा पडताळणी : तुम्हाला आलेल्या कोणत्याही स्थळाची पडताळणी करणे हे सगळ्यांसाठीच फार महत्वाचे असते खूप जण स्थळांची पडताळणी म्हणावी तशी करत नाही. वर वर पाहता एखादी व्यक्ती चांगली दिसली की त्याची चौकशी करणे सोडून देतात. हल्ली मोबाईल आणि डेटला जाणे अधिक पसंत केले



जाते. त्यामुळे होते असे की, वर वर पाहता एखादी व्यक्ती सुंदर दिसली की त्या व्यक्तीच्या प्रेमात पडल्यासारखे होते. प्रेम ही अशी गोष्ट आहे जी झाल्यानंतर स्थळामध्य असलेली एखादी खोटही तुम्ही दुर्लक्षित करता असे मुळीच करु नका. सगळ्यात आधी तुम्ही स्थळ योग्य तपासून घ्या. त्याचे वय, कुटुंब, मिळकत, नोकरीचे ठिकाण, राहण्याचे ठिकाण, घेतलेल कर्ज या गोष्टींची माहिती असणे हे फारच गरजेचे असते. जर या गोष्टी माहीत करुन न घेता तुम्ही लग्नाचा निर्णय घेतला तर तो तुम्हाला भारी पडू शकतो.

- पत्रिका घ्या पाहून : पत्रिका पाहणे हे आताच्या जनरेशनसाठी फारच जुनी अशी पद्धत आहे. प्रेमविवाह केला असेल तर अशावेळी पत्रिका पाहिलीसुद्धा जात नाही. पण अरेंज मॅरेज किंवा जुळवून लग्न करताना पत्रिका पाहणे हे फारच महत्वाचे ठरते. खूप जणांना पत्रिकेतील बऱ्याच गोष्टी जाणून घ्यायच्या असतात. पत्रिकेतील नाडी, रास, लग्न रास, असलेली एखादी समस्या जाणून घेणे खूपच महत्वाचे असते. जर तुमच्याकडे कोणी पत्रिका मागत असेल तर त्यांना तुम्ही अवश्य पत्रिका द्या. गूण जुळत असतील किंवा नसतील तरीदेखील त्यामधला काही मार्ग नक्कीच काढता येतो. त्यामुळे जर तुम्हाला यावर विश्वास असेल तर तुम्ही अवश्य पत्रिका बघा. म्हणजे तुमच्या मनाचे समाधान होईल.
- देवाण घेवाणाची बोलणी : देवाण घेवाणाची बोलणी ही देखील लग्नासाठी फार महत्वाची असते. खूप ठिकाणी लग्नाचा खर्च हा अर्धा अर्धा केला जातो. तर काही ठिकाणी मुलींनी सगळे लग्न करावे अशी अपेक्षा असते. त्यामुळे बरेचदा नात्यात तणाव येण्याची शक्यता असते. पैशांचे वाद हे नात्यात तडा आणण्यासाठी पुरेसे असतात. ज्या कुटुंबाशी तुम्ही संबंध जोडायचे म्हणत आहात किंवा विचारात आहात अशा कुटुंबाचे विचार जाणून घ्या. लग्नासंदर्भात त्यांचे विचार काय आहेत ते जाणून घ्या. म्हणजे तुम्हाला त्या कुटुंबाबद्दलची योग्य माहिती मिळू शकेल.कधी कधी या गोष्टीच कुटुंब आणि माणसं जाणून घेण्यासाठी महत्वाच्या असतात. त्यामुळे तुम्हाला आलेल्या स्थळातून परफेक्ट स्थळ निवडताना तुम्ही या गोष्टी करायला हव्यात.

# खास व्यक्तीचा बर्थ डे...

**वाढदिवस महत्त्वाचा आहे कारण या दिवशी प्रत्येकाला आपण खास असल्याची जाणीव हा दिवस देतो. त्यांच्यावर जवळच्यांचे आणि इतरांचेही किती प्रेम आहे ते हा दिवस दाखवून देतो. वाढदिवसामुळे एखाद्याला पुन्हा एकदा नवचैतन्याने जगण्याचं बळ मिळू शकतं...**



## वाढदिवस लक्षात कसा ठेवावा ?

*अनेकदा आपल्याला एखाद्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा संदेश द्यायच्या असतात. जसं बहीण-भावाला, पत्नीकडून पतीला किंवा पतीकडून पत्नीला, आई-वडिलांना, लाडक्या मुला- मुलीला, मित्र-मैत्रिणीला वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायच्या असतात. पण प्रत्येकाचा वाढदिवस लक्षात ठेवणे सोपे नाही. आता सोशल मीडियामुळे आपल्याला एखाद्याच्या वाढदिवसाचं नोटिफिकेशन येतं. पण काही जण सोशल मीडियावर नसतात. तेव्हा मात्र त्यांचा वाढदिवस लक्षात ठेवण्यात पंचाईत होते. तसंच काहींचा वाढदिवस हा फेसबुक नोटिफिकेशनपेक्षाही आपल्यासाठी जास्त महत्त्वाचा असतो. त्यामुळे आपल्याला त्यांच्या खास दिवसाची आधीच तयारी करायची असते. हा वेळ आपल्याला फेसबुक देत नाही.*

## काय कराल... ?

*तुमच्या फोनमधील किंवा शक्य असल्यास घरातील कॅलेंडरवर तुमच्या जवळच्यांचा आणि मित्रपरिवाराच्या वाढदिवसाचे दिवस नोंद करून ठेवा. यामुळे तुम्हाला एकाच ठिकाणी सगळ्यांचे वाढदिवस पाहता येतील. जर तुम्ही डायरी लिहीत असाल तर त्यात वाढदिवसाच्या नोंदी करून ठेवा. आजकाल डिजीटल कॅलेंडर्सही मिळतात. ज्यामुळे तुमचं काम नक्कीच सोपं होईल. यामुळे तुम्हाला वाढदिवस यायच्या आधीच कळेल आणि वाढदिवसाचं प्लॅनिंगही करायला वेळ मिळेल.*

## वाढदिवसासाठी नोटबुक किंवा डायरी

साध्या कॅलेंडरवर कुठे प्रत्येक महिन्याला वाढदिवस लिहीत बसणार नाही का? त्यापेक्षा तुमच्या रोजच्या डायरीत किंवा नोटबुकमध्ये नोंद करून ठेवा तुमच्या आवडत्या व्यक्तींच्या वाढदिवसाची. कारण रोज उठल्यावर किंवा कामाला सुरुवात करण्याआधी बरेच जणांना डायरी पाहायची सवय असतेच तर काहींना रात्री झोपण्याआधी डायरी लिहायची सवय असते. आपल्या प्रत्येकाकडे आजकाल स्मार्टफोन असतोच. ज्याच्या कॅलेंडरमध्ये बरेचदा तुमच्या गुगल कॉन्टॅक्टप्रमाणे माहिती नोंदविली जाते. हे डिजीटल कॅलेंडर तुम्ही अपडेट ठेवल्यास तुम्हाला आपोआप मीटींग किंवा इव्हेंट रिमाइंडरसोबत बर्थडे रिमाइंडर्सही येतील.

## खास डिजीटल ॲप

आजकाल डिजीटल ॲपचा जमाना आहे. प्रत्येक गोष्टीसाठी आता ॲप उपलब्ध आहे. मग वाढदिवसासाठी नाही असं कसं होईल. वाढदिवस लक्षात ठेवण्यासाठीही ॲप स्टोरवर अनेक ॲप उपलब्ध आहे. तुमच्या आवडीनुसार ॲप निवडा.

## वाढदिवसाला शुभेच्छा देणं का आहे महत्त्वाचं...




तुमच्या एका वाढदिवस शुभेच्छेने जर तुमचं नातं दृढ होणार असेल तर का नाही? मग ते प्रोफेशनली असो वा पर्सनली असो. जेव्हा एखाद्या बँकेकडून किंवा बिझनेसकडून कस्टमरचा वाढदिवस लक्षात ठेवला जातो. तेव्हा कस्टमरला नक्की छान आणि कौतुकास्पद वाटतं. जेव्हा आपला एखादा मित्र आपल्याला सरप्राईज किंवा स्पेशल गिफ्ट पाठवतो. तेव्हा आपल्याला आपली काळजी घेणारं कोणीतरी आहे असं नक्कीच वाटतं. जेव्हा एखादा बॉस आपल्या कर्मचाऱ्याला हॅपी बर्थडे विश करतो, तेव्हा कर्मचाऱ्यालाही त्याच्या कामाची किंवा त्या कंपनीत असल्याची पोचपावती खऱ्या अर्थाने मिळत असते.

# लग्नानंतरची दोन वर्षे अधिक काळजीची!

**संसार हा संघर्ष व समस्यांनी भरलेला असतो. काही जोडपी लग्नानंतर काहीच काळात वादाची शिकार होतात तर काही जोडपी नातं घट्ट ठेवण्यासाठी शक्य तितके प्रयत्न करताना दिसून येतात. आता ती गोष्ट वेगळी आहे की, लग्नानंतर नातं घट्ट व मजबूत बनवण्यासाठी अनेक प्रयत्न करून देखील काही लोकांचं नातं खिळखिळं होत जातं. पण लग्नानंतर सुरुवातीचे दोन वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. या सुरुवातीच्या काळात काही जोडपी एकमेकांना समजून घेण्यासाठी व खुश राहण्यासाठी एकमेकांच्या जास्तीत जास्त सहवासात राहतात तर काही जोडपी जबाबदाऱ्या व कर्तव्याच्या ओझ्याखाली दबून गेल्यासारखी राहू लागतात. यामुळे दोघांमध्ये नकारात्मक विचार जन्मास येऊ लागतात. म्हणूनच आज आम्ही सुरुवातीच्या दोन वर्षांचा काळ कसा सांभाळावा यासाठी काही खास टिप्स देणार आहोत...**



- प्रेमाने वागा : लग्नानंतर पहिले दोन वर्षे प्रत्येक जोडपं नातं घट्ट करण्यासाठी प्रयत्नशील असतं यात काहीच शंका नाही. या काळात पती-पत्नी एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात शिवाय एकमेकांच्या माहित नसलेल्या सवयी देखील त्यांना कळतात. प्रेमविवाह केलेल्या जोडप्यांना एकमेकांमधील चांगल्या-वाईट सवयी माहित असतात तर अरेंज्ड मॅरेजमध्ये याच्या एकदम उलट असते. अशावेळी आपल्या जोडीदाराची एखादी सवय खटकू लागल्यास त्यावरून वाद घालत बसण्यापेक्षा प्रेमाने संवाद साधा व समस्या सोडवा.
- नात्याची सुरुवात करा सकारात्मक : नातं कोणतंही असो, ते सकारात्मक विचारांनी सुरू करण्याचा सल्ला दिला जातो. असं यामुळे की, लग्नानंतर अनेक लोक स्वतःला जबाबदाऱ्या व कर्तव्यात बांधलं असल्याचं फिल करतात आणि या कारणामुळे त्यांना आपल्या जोडीदाराप्रती नकारात्मक भावना व भंग झाल्याच्या भावना मनात येऊ लागतात. पण ही चूक न करता प्रत्येक जोडप्याने आपलं सांसारिक जीवन एखाद्या मजेदार राईडसारखं जगलं पाहिजे. कारण यात एकमेकांसोबत आनंदाने जीवन जगण्याचा व एकत्र काही नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळते.
- रोमांस जिवंत ठेवा... : लग्न काळातील मजा व हनीमून संपल्यानंतर काही जोडप्यांना पुन्हा एकदा पहिल्यासारखं जीवन रटाळ वाटू लागतं. काही जोडपी हे विसरूनच जातात की सांसारिक जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडण्यासोबतच रोमांस जिवंत ठेवणंही गरजेचं असतं व हे शक्यही होऊ शकतं. नातं फ्रेश ठेवण्यासाठी हनीमूनसारख्या छोट्या मोठ्या ट्रिप्स काढणं गरजेचं असतं. या ट्रिप्स मध्ये एकमेकांना वेळ देण्याची संधी मिळते. शिवाय रोजच्या जीवनात काहीतरी नाविन्यपूर्ण गोष्टी अनुभवता येतात.



- संवाद कायम राखा : लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात अनेक जोडपी विविध कारणांमुळे एकमेकांशी संवाद साधणं टाळतात. जे की त्यांच्या संसारात गैरसमजांना निमंत्रण देऊ शकतं. संवाद आटल्यास पुढे जाऊन नातं खिळखिळं होऊ शकतं हे अनेक जोडपी विसरूनच जातात. त्यामुळे या काळात दूर पळण्यापेक्षा, वाद घालण्यापेक्षा, संवाद टाळून रुसून बसण्यापेक्षा एकमेकांना समजून घेण्याचा प्रत्येक जोडप्याने प्रयत्न करावा. संवाद ही सुखी नात्याची पहिली पायरी असते जी पार करणं सोपं नसतं.
- एकमेकांना वेळ द्या : लग्नानंतरचा सुरुवातीचा काळ असा असतो ज्यामध्ये तुम्ही नातं घट्ट करण्यासोबतच एकमेकांच्या मनात आपला आदर रुजवू शकता. बहुतांश जोडपी लग्न झाल्या झाल्या ऑफिसच्या कामाच स्वतःला जुंपून टाकतात याचा प्रभाव नव्याने सुरू झालेल्या सांसारिक आयुष्यावर पडू शकतो. यामुळे एकमेकांना जाणून घेण्याची संधीच मिळत नाही व यामध्ये एकमेकांविषयी चुकीचे समज बनवून पार्टनर तसं वागू लागण्याची शक्यता अधिक असते. शिवाय आपल्यासाठी जोडीदाराला वेळच नाही ही भावना मनात असुरक्षितता व नकारात्मक भावनांना खतपाणी घालू शकते. म्हणून लग्नाच्या सुरुवातीलाच नाही तर आयुष्यभर आपल्या जोडीदाराला भरपूर वेळ द्या व नातं सजीव ठेवण्याचा प्रयत्न करा.

# खासगी आयुष्याचं शेअरिंग करताना....

**सोशल मीडियाचं वाढतं क्रेज पाहता प्रत्येक जण आपल्या आयुष्यातील सामान्य ते खास क्षण तिथे हमखास शेअर करताना दिसतात. लग्न ठरल्यापासून हनिमूनपर्यंतच्या प्रवासात साजरे केलेले सारेच आनंदाचे क्षण नवविवाहीत जोडपी आपल्या कुटुंबीय व मित्रमंडळींसोबत सोशल मीडियावर शेअर करतात. जिथे सामान्य लोक फोटो टाकण्यात उशीर करत नाहीत तिथे सेलिब्रेटीचं काय घेऊन बसलायत? आवडत्या कलाकारांच्या फोटोंना चाहत्यांकडून लाखोमध्ये लाईक्स व कमेंट्स असतात. शिवाय ॲक्टिव राहण्यासाठी व आपल्या आयुष्याशी चाहत्यांनी जोडलेलं राहावं म्हणून कलाकारही आपले फोटो व विचार रोज सोशल मीडियावर शेअर करत असतात. हनीमूनचे फोटो सोशल मीडियावर अपलोड करणे खरंच योग्य आहे का? म्हणजे असे खासगी आयुष्याशी निगडीत फोटो कुठेही अपलोड करताना काही बेसिक गोष्टींची खबरदारी बाळगणं गरजेचं असतं, यापासून हल्लीची पिढी अनभिज्ञ आहे का?**



## इन्टिमेट फोटो टाकू नका...

भलेही आपला समाज आता पुढारतोय, मॉर्डन विचार स्विकारतोय पण तरीही किंसीग किंवा बेडरुममधील खासगी फोटो सोशल मीडियावर शेअर केल्याने तुम्ही लोकांच्या नजरेत येऊ शकता व नकारात्मक कमेंट्सचा तुम्हाला सामना करावा लागू शकतो. याबाबतील कलाकरांकडून अजिबात प्रोत्साहित होऊ नका, कारण त्यांच्या व तुमच्या फ्रेंड सर्कल-कुटुंबीयांमध्ये खूप अंतर असतं. सामान्य लोकांना काही मर्यादांचं पालन हे करावंच लागतं. तसंही इन्टिमेंट व रोमॅंटिक क्षण हे नवरा- बायकोमधील खासगी गोष्ट असून ती खासगीचं ठेवणं शहाण्याचं लक्षण असतं.

## जोडीदाराचाही विचार करा

तुम्हाला भलेही हनीमूनचे फोटो शेअर करण्यात काहीही चूक किंवा लाज वाटत नसेल पण कदाचित जोडीदार या गोष्टीबाबत कम्फर्टेबल नसू शकतो. अशावेळी त्याच्याही भावनांचा आदर करा. फोटो शेअर करण्यास तो अथवा ती तयार झाले तरीही सिलेक्ट केलेले फोटो एकदा त्याला जरुर दाखवा व त्याने सांगितल्यास एखादा फोटो काढूनही टाका. भलेही ही साधारण गोष्ट असेल पण एकमेकांच्या मनाचा व भावनांचा विचार केल्यास नातं अधिक दृढ होईल व जोडीदाराच्या मनातील तुमच्याबद्दलचा आदर आणखीनच वाढेल.

## शेअरिंग लिस्ट करा फिल्टर

आजकाल सोशल मीडियाद्वारे लोक कुटुंबीय, मित्रमंडळी, सहकारी, बॉस, नातेवाईक, शेजारी सर्वांशी जोडलेले असतात. अशावेळी तुम्ही शेअर केलेली प्रत्येक गोष्ट या लोकांच्याही नजरेस पडते. म्हणून फोटोंसाठी फिल्टर वापरणं गरजेचं आहे. खास करून हनीमून फोटो शेअर करताना अशा लोकांना नक्की हाईड करा जे याला चर्चेचा विषय व हसू बनवू शकतात. प्रत्येक व्यक्तीलाच आपल्या खास क्षणांचं कौतुक वाटेल, आनंद होईल असं मुळीच नाही. त्यामुळे आपल्या जीवलगांसोबत फोटो शेअर करताना फिल्टरचा वापर जरूर करा.

## लोकेशन शेअर करू नका

तुम्ही भले इंडियात फिरा किंवा बाहेरच्या देशात, पण एक्जेट लोकेशन शेअर करणं टाळा. सुरक्षितता लक्षात घेता असं करणं अत्यंत आवश्यक आहे. हनीमूनवरून परत घरी आल्यानंतर जर तुम्ही फोटोसहित लोकेशन शेअर करताय तर काही चिंता नाही पण फिरत असतानाच लोकेशन ॲड करणं समस्येला निमंत्रण देऊ शकतं. त्यामुळे तुम्ही एखाद्या ५ स्टार हॉटेलमध्ये राहा किंवा मग रिसॉर्टमध्ये, पण लोकेशन मात्र गुपितच ठेवा.

## सोशल मीडियापासून राहा लांब

सोशल मीडिया हल्ली एखाद्या व्यसनाप्रमाणे पसरतं आहे. म्हणजे एखादा व्यक्ती सोशल मीडियावर नसणं हे गावठीपणाचं लक्षणं मानलं जातं, अर्थात लोक असं हिनवतात. त्यामुळे अंदाजे ९९% लोकं ही आजच्या काळात हमखास सोशल मीडियाचा वापर करतात. इतर वेळी मन रमवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करणं वेगळं व आपल्या खास क्षणातही सोशल मीडियाला प्राधान्य देऊन आयुष्याचा हिस्सा बनवणं वेगळं. असं केल्याने तुम्ही हनीमून असो किंवा मग इतर कोणता क्षण, योग्य रितीने एन्जॉय करुच शकत नाही. २४ तास फोटो अपलोड करण्यास व्यस्त असल्यामुळे जोडीदारही कंटाळू शकतो. त्यामुळे आपल्या गोड क्षणांचा जास्तीत जास्त आनंद लुटा. स्वतःसाठी फिरा.



## शॉर्ट न्यूज

### कोल्हार परिसरात विजेचा लपंडाव

**कोल्हार :** परिसरातील तीन चारी भागात विजेच्या लपंडावामुळे शेतकरी हैरान झाले आहेत. पाणी असूनही विद्युत पुरवठ्याअभावी पिकांना देता येत नाही. वीज उपकेंद्राचे काम होत नाही. यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. तीसगाव सबस्टेशनवरील शेतकरी विजेच्या त्रासाने पुरता हतबल झाला असून डोळ्यादेखत पिके सुकून चालली आहेत. बिल भरले नाही तर वीज कनेक्शन लगेच कट करतात. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मंजूर झालेले वीज उपकेंद्राचे काम झाले नाही. याबाबत परिसरातील शेतकऱ्यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन दिले.

### श्रीरामपुरात १५० किलो गोमांस पकडले

**श्रीरामपुर :** येथे १५० किलो गोमांस घेऊन जाणाऱ्या वाहतुकीसह आरोपी पकडण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात बाबळेश्वर वरून छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या सिल्वर सिल्व्हर रंगाची मारुती अल्टो गाडी पोलिसांच्या निदर्शनास पडले. पोलिसांना शंका आल्याने त्यांनी चालकाची विचारपूस केली. तेव्हा चालक बिथरल्याचे लक्षात आले. वाहनाची तपासणी केली, असता त्यात गोवंशीय जनावरांचे १५० किलो गोमांस असल्याचे आढळले. फारुख अब्दुल्ला शेख (वय ३९, रा. पिंपरीराजा ता. जि. छत्रपती संभाजीनगर) यांला पोलिसांनी ताब्यात घेतले.

### तरुणाची विष प्राशन करून आत्महत्या

**राहुरी :** तालुक्यातील ताहाराबाद येथील नितीन नानासाहेब विधाटे, वय २४ वर्षे, या विवाहित तरुणाने रात्रीच्या दरम्यान त्याच्या राहत्या घरात विषारी औषध प्राशन केले. सकाळी त्याचा मृतदेह घरात आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक रामनाथ सानप यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदन केले. नितीनच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई, वडील, सहा बहिणी असा मोठा परिवार आहे. नितीन याने नेमके कोणत्या करणातून आत्महत्या केली. हे समजू शकले नाही.

### कोपरगाव पालिकेने आरोग्याशी खेळ मांडला

**कोपरगाव :** नगरपालिकेत गेल्या काही वर्षांपासून प्रशासकीय राज सुरू आहे. नगरसेवक, नगराध्यक्ष सत्तेत नसल्याने स्वैराचार सुरू झाला आहे. जनता बिचारी मुकी, कुणीही हाका सहन करत असल्याने अक्षरशः आरोग्याशी खेळ मांडल्याचे संतप्त चित्र दिसत असल्याची नाराजी लोकस्वराज्य आंदोलनचे कार्यकर्ते नितीन पोळ यांनी व्यक्त केली आहे. गटारीतसुद्धा नाही इतके घाण पाणी नळावाटे दिले जाते आहे. यामुळे जनता बेजार तर पाण्याचे जारवाले मालामाल झाले आहेत. नळाचे पाणी तोंडात घेण्यासारखेसुद्धा नाही. अनेक आजार बळावत आहेत.

### तारकेश्वर गडावर भाविकांची मांदियाळी

**पाथर्डी :** संत नारायण बाबांना जाऊन आज तेरा वर्षे पूर्ण झाली. मात्र, त्यांनी दाखविलेला विचाराचा मार्ग आजही आपल्याला त्यांची असण्याची जाणीव करून देत आहे. संत वामनभाऊ, संत भगवान बाबांनंतर नारायण बाबांना वाचासिद्धीची विद्या शक्ती प्राप्त होती. त्यांच्या मुखातून गेलेला शब्द हा अंतिम होता. तो खरा ठरत होता, त्याचा स्वतः मला पंचवीस वर्षांपूर्वी अनुभव आल्याचे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. संत नारायण बाबांचा तेरावा पुण्यतिथी सोहळा श्री. क्षेत्र तारकेश्वरगड (महिंदा) येथे सोमवारी आयोजित करण्यात आला होता. यावेळी धस बोलत होते.

# बारावीच्या निकालात प्रवरेची गुणवता कायम!

## संस्थेच्या १० कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल शंभर टक्के




**लोणी प्रवरा : प्रतिनिधी**

**लोकनेते पद्मभुषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या इयत्ता बारावीच्या निकालात संस्थेने आपली शैक्षणिक गुणवता कायम राखली असून, संस्थेच्या १० महाविद्यालयांनी निकाल १०० टक्के निकालाची परंपरा यंदाही राखली आहे. विज्ञान १० ,कला २ वाणिज्य शाखेतील ४ तर किमान कौशल्य अभ्यासक्रम शाखेतील २ महाविद्यालयांचा समावेश आहे.,प्रवरेच्या इंग्रजी माध्यमांच्या तीनही शाखांचा निकाल १०० टक्के लागला असल्याची माहीती संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ.लिलावती सरोदे यांनी दिली.**

लोकनेते पद्मभुषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या १७ कनिष्ठ महाविद्यालाने आपली निकालांची परंपरा कायम ठेवली आहे.यावर्षी २५६० विद्यार्थी पैकी २४६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संस्थेचा कला शाखेच्या १२ महाविद्यालयाचा निकाल ८५.१३ लागला असून प्रवरा कन्या विद्या मंदीर लोणी आणि कै. जनार्दन काळे पाटील विद्यालय चिंचोली या कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० टक्के लागला असून कला शाखेतून ४१७ पैकी ३५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेच्या महाविद्यालयांचा निकाल ९८.९२ टक्के लागला असून मराठी माध्यमातील छत्रपती शिवाजी महाराज कनिष्ठ महाविद्यालय पाथरे, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील महाविद्यालय बाभळेश्वर,डॉ.बाबासाहेब आंबडेकर कनिष्ठ महाविद्यालय,भगवतीपूर या तीन तर इंग्रजी माध्यमातील प्रवरा पब्लीक स्कूल प्रवरानगर,प्रवरा सेंट्रल पब्लीक स्कुल प्रवरानगर,पद्मश्री डॉ.विखे पाटील सैनिकी स्कुल,प्रवरानगर या तीनही महाविद्यालयांचा १०० टक्के लागला असून, १८५१ पैकी १८३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याचे सौ. सरोदे यांनी सांगितले.

वाणिज्य शाखेचा निकाल हा ९४.९२ टक्के लागला असून डॉ.बाबासाहेब आंबडेकर महाविद्यालय भगवतीपूरचा निकाल १०० टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेतून २३६ पैकी २२४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर किमान कौशल्य शाखेचा निकाल ९६.४३ टक्के लागला असून प्रवरा कन्या विद्या मंदीरच्या कनिष्ठ महाविद्याल लोणी याचा निकाल १०० टक्के लागला.

यशस्वी विद्यार्थ्याचे संस्थेचे अध्यक्ष आणि महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील,माजी अण्णासाहेब म्हस्के पाटील,जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालीनीताई विखे पाटील, खा.डॉ. सुजय विखे पाटील,प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ.राजेंद्र विखे पाटील,सह सचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.शिवानंद हिरेमठ, अतांत्रिकचे संचालक डॉ.प्रदिप दिघे, शिक्षण समन्वयक प्रा. नंदकुमार दळे यांनी आभिनंदन केले.

**परंपरेचा आलेख उंचावत असल्याचा अभिमान**

विद्यार्थी,शिक्षक आणि पालक या सर्वानीच केलेल्या सांघिक प्रयत्नामुळे अहील्यानगरची निकालाची परंपरा कायम राखली गेली आहे.माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा महामंडळाच्या निकालाची आकडेवारी पाहीली तर आपला जिल्हा गुणवेतत तिसर्या क्रमांकावर आहे.याचाच अर्थ जिल्ह्याच्या शैक्षणिक परंपरेचा आलेख उंचावत आहे याचा सर्वानाच अभिमान असल्याचे नमूद करून जिल्ह्यातील सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले असून या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे संस्थाचालक पालक यांचेही अभिनंदन केले आहे.

# स्पर्धकांच्या नृत्याविष्काराने जिंकली रसिकांची मने!

## जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेला उत्सफूर्त प्रतिसाद वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजन



**राहुरी : प्रतिनिधी**

**राहुरी फॅक्टरी येथील वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून जिल्ह्यातील जवळपास ८० स्पर्धकांनी आपली कला सादरीकरण उपस्थितांची मने जिंकली.**

या स्पर्धेचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम,माजी उपनगराध्यक्ष प्रकाश संसारे,साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे, उद्योजक भारत शेटे, स्वराज्य उद्योग समूहाचे किशोर गडाख, शैलेंद्र शिंदे, उद्योजक स्मितेश राका,प्रकाश कुऱ्हाडे,ओमकार कोबरणे,ज्ञानेश्वर मोरे, गोपाल शिंदे,सचिन जाधव,अमोल तुरकणे, शशिकांत खाडे, दीपक माळी, अशोक पटारे,प्रशांत कोठुळे, जालिंदर दोंड,सचिन कदम,अमोल कदम,प्रसाद कदम,सुजित लोंढे,योगेश मोरे,अक्षय पेरणे,किशोर गोसावी,शरद साळुंके आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी अकोले, संगमनेर, राहुरी, कोपरगाव, श्रीरामपूर, नेवासा, अहमदनगर यासह जिल्ह्यातील विविध भागांतील कलाकारांनी सोलो व सामूहिक नृत्य सादर करून सर्वांची वाहवा मिळवली.स्पर्धेचे परीक्षण शिवचरित्रकार हसन सय्यद पुणे येथील रुही सय्यद व भाग्यश्री दातखीळे यांनी केले. प्रास्तविक संस्थापक अध्यक्ष वसंत कदम यांनी केले तर सूत्रसंचालन श्रीकांत जाधव यांनी केले.

या नृत्य स्पर्धेत सामूहिक नृत्य मोठा गट प्रथम विजेते स्नेहमाला डान्स अकॅडमी, श्रीरामपूर,द्वितीय विजेते चंदनेश्वर विद्यालय संगमनेर तर लहान सामूहिक नृत्यामध्ये प्रथम पारितोषिक भाग्या ग्रुप, राहुरी, द्वितीय पारितोषिक नटराज ग्रुप, राहुरी फॅक्टरी व नृत्यराज ग्रुप, अकोले यांना विभागून देण्यात आले. मोठा गट सोलो प्रकारात प्रथम पारितोषिक गौरव अनाप, अकोले व खुशी टंकवाल, अकोले यांना विभागून देण्यात आले ,द्वितीय पारितोषिक सौरभ पाटील, अहमदनगर व सुरु गवारे, श्रीरामपूर यांना विभागून देण्यात आले तर तृतीय पारितोषिक राजेश व्यवहारे, अहमदनगर व आदित्य टंकवाल, अकोले यांना विभागून देण्यात आले.

लहान गट सोलो प्रकारात प्रथम पारितोषिक वेदिका एरंडे लअकोले, कृपा वाकचौरे ,अकोले यांना विभागून,द्वितीय पारितोषिक विभागून सिद्धी जंगम, राहुरी व आराध्या शिंदे अकोले, तृतीय पारितोषिक तेजस्विनी शेळके, अहमदनगर व सुष्टी बेल्हेकर, सोनई यांना विभागून तर चतुर्थ पारितोषिक संभव गाढे, राहुरी व भक्ती चुत्तर, राहुरी यांना विभागून देण्यात आले.

अवंतिका शेटे, देवळाली प्रवरा व तन्वी लोंढे राहुरी फॅक्टरी यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.स्पर्धा यशस्वीतेसाठी वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

(पान १ वरून)

### चाऱ्यातून झालेल्या विषबाधेने ३० मेंढ्या दगावल्या

पुणे येथील विभागीय प्रयोगशाळेत पाठवण्यात आल्याचे पारनेरचे पशुधन विकास आयुक्त डॉ. सोपान नांदे यांनी सांगितले.प्रयोगशाळेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर विषबाधेचे नेमके कारण स्पष्ट होईल असे डॉ.नांदे म्हणाले.

पारनेर तालुक्याच्या आदिवासी बहुल ढवळपुरी परिसरा खालोखाल कुकडी कालव्याच्या लाभक्षेत्रात मेंढ्या व मेंढपाळांची संख्या मोठी आहे.
कोहकडी,कुरुंद,राळेगण थेरपाळ परिसरातील मेंढपाळांकडे किमान १४ ते १५ हजार मेंढ्या आहेत.मेंढ्याची संख्या जास्त असल्याने चारा व पाण्याच्या शोधात मेंढपाळ भटकंती करीत असतात.कोहकडी येथील तान्हाजी टकले सध्या मेंढ्यांसह वाडेगव्हाण,नारायण गव्हाण परिसरात वास्तव्यास आहेत.मंगळवारी सकाळी चरत असतानाच मेंढ्या मृत्यूमुखी पडण्यास सुरुवात झाली.अवघ्या दीड तासात तीस मेंढ्या दगावल्या तर पाच मेंढ्या अत्यवस्थ झाल्या. अत्यवस्थ मेंढ्यावर उपचार सुरू असून पशुधन विकास अधिकारी नवनाथ पडवळ त्यांच्यावर लक्ष ठेवून आहेत.

### १२ वर्षांनी त्यांना जाग आली!

मात्र, या आरोपांमध्ये तथ्य नसल्याचे पुराव्यांनीशी समोर आले होते. माझ्यावर आरोप करणारे खैरनार, अण्णा हजारे इतरांचे काय झाले? ते आज कुठे आहेत?, असंही शरद पवार म्हणाले. राज्यात पाच टप्प्यात मतदान राज्यात लोकसभा निवडणुकीसाठी पाच टप्प्यात मतदान पार पडले. महाविकास आघाडी आणि महायुतीने जोरदार प्रचार केला आहे. आता ४ जूनला निकाल येणार असून या निकालावरुन अनेक नेते दावे करत आहेत.


ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
स्तनांचे आजार आणि उपचार
PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे (म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST | MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# वीजेच्या लपंडावाने सुपा परिसर हैराण!

## महावितरण विरोधात संताप

**सुपा : प्रतिनिधी**

**गेल्या आठ दिवसांपासून ढगाळ आणि पावसाचे वातावरण निर्माण होत असताना दुसरीकडे वीजेच्या लपंडावामुळे सुपा परीसरातील नागरीक हैराण झाले आहेत. उष्णता वाढल्याने पंखे, वातानुकूलीत यंत्रांचा वापर वाढलेला असतानाच वीज नसल्याने उकाडयामुळे नागरीकांचा जीव कासावीस होतो आहे. महावितरणच्या या गलथान कारभाराबाबत परिसरात संताप व्यक्त करण्यात येत आहे.**

वीजेचा लपंडाव सुरू असल्याने व्यवहार ठप्प झाले आहेत. वीज बिले भरून घेताना महावितरणकडून मोठी तत्परता दाखविली जाते अशीच तत्परता वीज खंडीत झाल्यानंतर ती सुरळीत करण्यासाठी का दाखविली जात नाही असा सवाल करून महावितरणचे अभियंता व कर्मचारी वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यात सपशेल अपयशी ठरल्याची टीकाही करण्यात येत आहे.

यंदा मे महिन्यातच पावसाने हजेरी लावली आहे. शेतीसाठी सोडा परंतू पिण्यासाठी पाणी उलपब्ध होत नसताना आहे ते पाणी वीज पुरवठा खंडीत झाल्याने उपसता येत नाही. परिणामी पिण्याच्या पाण्याची समस्याही भेडसावते आहे.




सुपा केव्ही उपकेंद्रातून सुपा शहर, औद्योगिक वसाहत, कोल्हे वस्ती, वाळवणे, कडूस फिडर, अपधूप, वाघुंडे, बाबुर्डी, रूईछत्रपती, भोयरे गांगर्डा, कडूस आदी ठिकाणी शेती पंप व सिंगल फेजसाठी वीज पुरवठा केला जातो. विजेच्या लपंडावामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वीजेवर चालणारे विविध कंपन्यांचे मोबाईल टॉवर बंद होत असल्याने या भागातील सर्वच नागरीक आऊट ऑफ रेंज झाले आहेत.

### पावसाचे चिन्ह दिसले की वीजपुरवठा बंद !

**पावसाचे वातावरण निर्माण झाले, सोसाटयाचा वारा सुटला तरी आपधूप, रूईछत्रपती, बाबुर्डी, भोयरे गांगर्डा, कडूस आदी गावांचा वीज पुरवठा तात्काळ बंद केला जातो. सुप्यात पाऊस सुरू झाला तरी कडूस फिडरचा वीज पुरवठा बंद केला जातो. महावितरणच्या या पायाभुत सुविधा इतक्या कमकुवत असतील तर महावितरणचे कर्मचारी करतात तरी काय असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. यंदा उष्णतेचा पारा ४१ अंशांहून अधिक पोहचला आहे. त्यामुळे रात्री तसेच दिवसा भयंका उष्णता जाणवते. शनिवारी महावितरणच्या वतीने टॉवर लाईच्या कामासाठी सकाळी १० ते दुपारी अडीच वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद राहणार असल्याचे जाहिर केले होते. प्रत्यक्षात सायंकाळी सात वाजल्यानंतर वीज पुरवठा सुरू झाला. मंगळवारी मध्यरात्री दहा मिनिटे पाऊस झाला. महावितरणकडून तात्काळ वीज खंडीत करण्यात आली. उष्णतेमुळे नागरीकांना रात्र जागून काढावी लागली. बुधवारी दुपारपर्यंत वीज पुरवठा सुरळीत झाला नव्हता.**

# बक्षिस फीसाठी देणाऱ्या सिध्दीचे यशही घवघवीत!

## कान्हूरच्या सिध्दी दुधंवची यशोगाथा

**कान्हूरपठार : प्रतिनिधी**

**वडील वेल्डर आणि आई मोलमजुरी करून चरितार्थ चालवितानाच तीन मुलींच्या शिक्षणाची जबाबदारीही त्यांच्यावर आहे. आई वडीलांच्या या संघर्षाकडे पाहून दत्तात्रय व सीमा दुधंव यांची थोरली कन्या सिध्दी हिने परीक्षेसाठीची फी वकृत्व स्पर्धेत मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेतून भरून तीने आई वडीलांचा भार हलका केला. मंगळवारी जाहिर झालेल्या बारावीच्या परीक्षेत शास्त्र शाखेत सिध्दी हिने ८०.८० टक्के गुण मिळवून आपले कर्तुत्व सिध्द केले.**

सिध्दी दुवंध ही कान्हूरपठारच्या जनता विद्या मंदीराची विद्यार्थीनी. वक्तृत्व कला अंगी असलेल्या सिध्दीमधील गुण हेरून आडवाटेचं पारनेर या चळवळीचे प्रमुख प्रा. तुषार ठुबे यांनी तिच्यातील वक्तृत्व कला वृध्दींगत करण्यासाठी मार्गदर्शन केले. उजपत गुण असलेल्या सिध्दीने वक्तृत्वाचे धडे अल्पावधीत आत्मसात करीत राज्यपातळीवरील स्पर्धा गाजविल्या. नाटय स्पर्धेत सेनापती बापट नाटय करंडक स्पर्धेत उत्कष्ट अभिनयाचे बक्षिसही तीच्या वाटयाला आले.विविध स्पर्धांमधून मिळालेल्या बक्षिसांच्या रकमेतून सिध्दी हीने शिक्षणाचा खर्च, कपडे तसेच इतर साहित्य खरेदी केले. परीक्षेची फी देखील याच रकमेतून तीने भरली. मंगळवारी बारावीचा निकाल जाहिर झाल्यानंतर शास्त्र शाखेत सिध्दी हीने ८०.८० टक्के गुण मिळवून आपले कर्तुत्व सिध्द केले.



**■ वकृत्व स्पर्धेत मिळविलेल्या करंडकासह सिध्दी व तिचे आई वडील.**

दररोज अभ्यास, आवांतर वाचनाची आवड, मनापासून सर्वच क्षेत्रात आपले वेगळेपण सिध्द करण्याची जिद्द बाळगल्याने मला विविध क्षेत्रात यश मिळाल्याचे सिध्दी हिने आवर्जुन सांगितले. जनता विद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक, शाळा समिती सदस्य तसेच ग्रामस्थांनी सिध्दीच्या यशाचे कौतुक केले.

### सिध्दीची यशोगाथा प्रेरणादायी

**परीक्षेच्या काळात शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात शिवव्याख्याती म्हणून सिध्दी हिने जोरदार भाषण ठोकले. सिध्दीची यशोगाथा युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सांगितले.**

### गुणवंत होऊन आई वडीलांना आधार

**आई वडील संसाराचा गाडा हाकत असताना संघर्ष करत असताना आपण गुणवंत होऊन त्यांना आधार देण्याचा निर्धार सिध्दीने केला होता. तिच्यासह घरात तिघी बहिणी. सिध्दी थोरली. अभ्यासाबरोबरच वकृत्व कला आत्मसात करून सिध्दी हीने आपले वेगळेपण सिध्द केले.**

# जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करा

## मनसे नेते अविनाश पवार यांची मागणी



**■ तालुक्यातील दुष्काळ सदृश स्थितीच्या पार्श्वभुमीवर जनावरांसाठी चारा छावण्या व पाण्याची सोय करण्याच्या मागणीचे निवेदन मनसे नेते अविनाश पवार यांनी तहसिलदारांना दिले.**

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यात दुष्काळ सदृश स्थिती निर्माण झाल्याने विशेषतः जनावरांच्या चाऱ्याचा तसेच पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असून प्रशासनाने जनावरांच्या चारा छावण्या तसेच पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी मनसे नेते अविनाश पवार यांनी तहसिलदार गायत्री सैंदाणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

पवार यांनी निवेदनात नमुद केले आहे की, तालुक्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने जनावरांना चारा तसेच पाणी उपलब्ध करण्यासाठी शेतकरी बांधवांना संघर्ष करावा लागात आहे. सध्या दुधाचे दर कमी झाल्याने दुग्धव्यवसायीक शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. त्यातच काही महिन्यांपूर्वी तालुक्याच्या अनेक भागात वादळी वाऱ्यासह गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या शेतांमधील विविध पिकांबरोबरच चारा पिकेही जमीनदोस्त होउन मोठा आर्थिक फटका बसला आहे.

आगोदर गारपीट व आता दुष्काळी स्थितीमुळे शासनाकडून काहीही मदत न मिळाल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे. जनावरांच्या चाऱ्यासाठी खर्च वाढला आहे. शेतकरी बांधवांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी तसेच त्यांचे पशुधन वाचविण्यासाठी लवकरात लवकर चारा छावण्या सुरू कराव्यात अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी या मागणीसंदर्भात वरीष्ठांकडे अहवाल पाठवून सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही दिली. शेतकरी बांधवांना आधार देण्यासाठी प्रशासन बांधील असल्याचेही त्यांनी नमुद केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते कल्याण शहाणे, नितीन म्हस्के, मारूती रोहोकले, सतिश म्हस्के यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# मतदान पद्धतीने निवडणूक ही निघोजच्या युवा पुढाऱ्यांना धोक्याची घंटा!

## ■ उत्सव आणि परिसर विकासासाठी राजकारण आणू नका ■ ज्येष्ठांची सुचना योग्य

**निघोज : प्रतिनिधी**

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टची विशेष सर्वसाधारण सभा नुकतीच मोठ्या गोंधळात संपन्न झाली. गेली चाळीस वर्षांपूर्वी निघोज येथील दिवंगत व ज्येष्ठ कारभारी मंडळींनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टची स्थापना करुण जो धार्मिक संस्कृती जतन करीत व ती संस्कृती वाढविण्यासाठी तसेच तिर्थक्षेत्र अंतर्गत व पर्यटन अंतर्गत राज्य व केंद्र सरकारच्या विविध विकासकामांच्या योजनांचा फायदा होउन गाव विकासाच्या योजना राबवल्या जातील व त्या माध्यमातून मळगंगा देवीचा यात्रा, नवरात्र तसेच वर्षातील पाच ते सहा उत्सव संघटीतपणे मोठ्या प्रमाणात साजरे होतील हा उद्देश ठेवून ट्रस्ट स्थापना केली आहे. मात्र निघोजचे राजकारण एवढ्या खालच्या पातळीवर आले आहे की देवाच्या मंदिरात सुद्धा राजकारण आणले गेले आहे हेच या विशेष सर्वसाधारण सभेतील गोंधळ, हमरीतुमरी आणी एकमेकांवर धावून जाणे हे दिसून आले आहे.**

जगप्रसिद्ध रांजणखळगे हा देशाचा अमुल्य ठेवा आहे. मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान आहे. पर्यटन आणि तिर्थक्षेत्र या माध्यमातून राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून तसेच लोकसहभागातून निघोज आणी कुंड या ठिकाणी मोठ्या विकास योजना मार्गी लागल्या आहेत. गेली पाच पंचवीस वर्षात सहकारी पतसंस्था हा राजकारणाचा अड्डा झाला होता. पतसंस्थेच्या माध्यमातून राजकारणात काहीही करता येत होते मात्र या राजकीय ईर्षेतून काय झाले हे आज आपण पाहात आहे.

तालुक्यातील बहुतांश पतसंस्थांना अखेरची घरघर लागली आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकारण केले जाते आणि या संस्थांना राजकारण मानवले जाते ही परिस्थीती आहे कारण सरकारचे थेट नियंत्रण त्या संस्थांवर आहे हे आपण दुर्लक्षून चालणार नाही. मात्र धार्मिक संस्था म्हणून नावलौकिक असलेली मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट ही आपल्याच नेतृत्वाखाली पाहीजे हा अट्टाहास मात्र चुकीचा आहे. त्या ठिकाणी गावकऱ्यांच्या सहमतीने निवडलेले विश्वस्त मंडळ पाहिजे तरच त्या ठिकाणी गावचा एकोपा वाढीस लागेल हे मात्र नक्की.



**■ मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट सभासदांचा गोंधळ**

धर्मादाय आयुक्त यांनी दिलेल्या नियमावलीनुसार जरी काम होत असले तरी ते काम कशाप्रकारे पारदर्शक आहे की नाही हा मुद्दा लक्षवेधी आहे. देवाच्या कामात राजकारण नको ही ९५ टक्के गावकऱ्यांची भावना आहे. जागृत देवस्थान हा प्रत्यय शेकडो वर्षांपासून आला आहे. गर्वाचे घर खाली अशाप्रकारे शेकडो कुटुंबांना याचा अनुभव या देवस्थान परिसरात आला आहे. म्हणून आजच्या युवा पुढाऱ्यांनी या ठिकाणी राजकारण न आणता गाव करील ते राव करु शकत नाही याप्रमाणे भुमिका घेण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे.

गेली वर्ष दिड वर्षात सभासद वाढ झाली मुद्दा योग्य की अयोग्य हे ठरवणारे सभासद असले तरी यामध्ये खरा अधिकार धर्मादाय आयुक्त यांनाच आहे यासाठी विशेष वार्षिक सर्वसाधारण सभेत गोंधळ न घालता ज्या दिवशी सभासद यादी प्रसिद्ध झाली त्याच वेळी हरकत घेऊन धर्मादाय आयुक्त कार्यालयात हरकत घेऊन याचा निपटारा झाला असता मात्र सभेत गोंधळ घालून याची चर्चा जिल्ह्यात होत आहे याचाही संबधीतांना विसर पडला आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी सभा संपन्न झाल्यानंतर लगेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याची घाई केली हा विषय संशयास्पद असल्याची चर्चा सध्या सुरू आहे.

विशेष सभा झाल्यानंतर गावकीची बैठक घेऊन बिनविरोध निवडीची चाचपणी केली असती तर बरे झाले असते. ग्रामपंचायत हातातून गेली. त्या नंतर सोसायटी ताब्यात घेतली आता ट्रस्टमध्ये सभासद वाढ आपणच केल्याने ट्रस्ट मध्ये आपणच ही खात्री त्यांना झाल्याने लगेच निवडणूक लावण्यात आली आहे. मात्र अद्यापही वेळ गेली नाही युवा पुढाऱ्यांनी ज्येष्ठ व जाणते मंडळींचे मार्गदर्शन घेऊन ही निवडणूक बिनविरोध करावी अशी भुमिका गावकऱ्यांची असल्याने निवडणूक झाल्यानंतर पुढील निवडणूका सुद्धा आपल्याला सोप्या जातील हा युवा पुढाऱ्यांचा भ्रमनिरास ठरणार आहे हे मात्र नक्की.

# मुलिका देवी विद्यालयाचा निकाल ९७.७९ टक्के

## कला शाखेचा निकाल ९०.९० टक्के



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील मुलिका देवी विद्यालयाचा बारावीचा विज्ञान शाखेचा निकाल ९७.७९ % तसेच कला शाखेचा निकाल ९०.९० % लागला असून सर्वत्र प्राचार्य अर्जुन भुजबळ त्यांचे शिक्षक सहकारी व विद्यार्थी यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.**

**विज्ञान शाखा**

प्रविष्ट विद्यार्थी संख्या: २२७
उत्तीर्ण विद्यार्थी संख्या: २२२
शेकडा निकाल: ९७.७९ %
विज्ञान शाखेचे प्रथम पाच आलेले विद्यार्थी आदर्श संतोष सुपेकर: ७७.१७ %, ओंकार संतोष लाळगे: ७५.६७ %, अनिकेत बाबाजी कांदळकर : ७५.५०%,आदेश सुनील वराळ: ७४.६७ %, स्वाती भरत वराळ: ६८.६७

**कला शाखा**

प्रविष्ट विद्यार्थी संख्या: ३३
उत्तीर्ण विद्यार्थी संख्या: ३०
शेकडा निकाल: ९०.९०%
विद्यालयातील एकूण उत्तीर्ण विद्यार्थी संख्या : २५२
कला शाखेत प्रथम पाच आलेले विद्यार्थी: ऋतुजा अंकुश घोडे : ७०.८३%,प्रियंका विठ्ठल साळवे ६९.%, रेणुका अनिल जाधव ६७.६७ %, सलोनी जालिंदर पांढरकर ६२.६७ %, तनुजा अनिल व्यवहारे ६२.६७ %,,वाव्हळ वैष्णवी गणेश:६२.५० %,विद्यालयातील एकुण उत्तीर्ण विद्यार्थी संख्या : २५२,विद्यालयाचा एकूण शेकडा निकाल : ९६.९२ %

प्राचार्य अर्जुन भुजबळ यांनी गेली वर्षभरात मुलिका देवी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत. पुर्वी दहावी व बारावी परिक्षा कार्यकाळात या शाळेच्या भोवती टुकार युवकांचे रिंगण असायचे राजकारणात सक्रिय असणाऱ्या युवा पुढाऱ्यांचे समर्थक असणारे हे युवक परिक्षा कार्यकाळात आपले नातेवाईक व मित्र परिवारातील विद्यार्थी सदस्यांना या माध्यमातून कॉपी पुरवीण्याचे काम करायचे पोलिस बंदोबस्त असूनही या ठिकाणी हा प्रकार सातत्याने सुरू होता. मात्र प्राचार्य भुजबळ सर यांनी या ठिकाणी आल्यानंतर अतिशय कडक शिस्तीचे कामकाज करीत विद्यार्थी व शिक्षक यांना शिस्त लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात काम केल्याने पालक, विद्यार्थी, ग्रामस्थ व निघोज व परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी सरपंच, उपसरपंच यांनी समाधान व्यक्त करीत भुजबळ सर व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले आहे .

# गुरूदेवच्या ५ विद्यार्थ्यांनी मिळविले १०० पैकी १०० गुण !

## विद्यालयाचा निकालही १०० टक्के !

**सुपा : प्रतिनिधी**

**राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिम शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत सुपा एमआयडीसी लगतच्या गुरूदेव ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या ५ विद्यार्थ्यांनी माहिती व तंत्रज्ञान या विषयात शंभर पैकी शंभर टक्के गुण मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. विद्यालयाचा शास्त्र शाखेचा निकालही शंभर टक्के लागला.**



विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर, संस्थापक सुभाष मगर, शोभा शिर्के, अविनाश पवार, शंकर दोरगे, मोहन तांबे, त्रिंबक दुधाडे, सुनील झरेकर व इतर संचालकांनी अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य संतोष खराबी, मुकुंद साठे, भरत चौधरी, मंगेश चितळकर, तुषार दाते, वैभव मलभारे यांचे मार्गदर्शन लाभले. शालेय वेळेपेक्षा अतिरिक्त तासिकांचे आयोजन, पुर्व नियोजन, अनुभवी प्राध्यापक वर्ग, अभ्यासक्रमात मराठीऐवजी माहिती व तंत्रज्ञान या विषयाचा समावेश, सुसज्ज प्रयोग शाळा, संगणक कक्ष तसेच करडी शिस्त या सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याचे संचालिका छाया मगर यांनी सांगितले.

### यांनी मिळविले विशेष प्राविण्य

**रिध्दी अरूण रेपाळे ८७.५०,श्वेता सुरेश सोनवणे ८४.८३,साक्षी सतीश मगर ८०, ओंकार अविनाश थोरात ७८, तनुजा अमोल देशमुख ७७.५**

### आयटीमध्ये १०० पैकी १०० !

**ओंकार अविनाश थोरात, यशराज सुनील थोरात, साक्षी दीपक पवार, सत्यजित भाग्येश देशमुख, गौरी कारभारी पोटघन**

### गुरूदेव म्हणजे गुणवत्ता !

**संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर यांनी वर्षभराचे नियोजन करून तंत्रज्ञानाचा योग्य वापर करीत दर्जेदार शिक्षण दिल्याने या संस्थेचा पट पाच वर्षात ९०० पेक्षा अधिक झाला आहे. गुरूदेव कॉलेजमध्ये क्लास आणि कॉलेज एकाच ठिकाणी असल्याने सीईटी, जेईई, नीट या प्रवेश परीक्षांची तयारी करून घेण्यात येते. त्यातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते. गुरूदेव म्हणजे गुणवत्ता हे समिकरण झाले असून परराज्यातील विद्यार्थीही या विद्यालयात शिक्षण घेत आहेत.**

**'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com**
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com